CMYK

**बांगलादेशातील हिंदू विरुद्ध अत्याचार मोदी सरकारने रोखावेत** >>पान 2

**राज्यपाल पद मिळवून देण्याच्या अमिषाने एका महाठगाकडून शास्त्रज्ञाची फसवणूक** >>पान 3

**सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ** >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
कर्तव्यदक्ष असावे पण कर्मठ नसावे.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



**'सावळ्याची जणू सावली' फेम प्राप्ती रेडकरचा 'पुष्पा २'मधील 'अंगारो' गाण्यावर जबरदस्त डान्स**
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 119 ■ मंगळवार, दि. 10 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निवडीबद्दल अभिनंदन

## ॲड.राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी एकमताने निवड

**मुंबई/प्रतिनिधी** : विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात विधानसभा सदस्य ड. राहुल नार्वेकर यांची १५ व्या विधानसभेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ॲड. राहुल नार्वेकर यांच्या विधानसभा अध्यक्षपदासाठीच्या नावाचा प्रस्ताव सभागृहात मांडला. या प्रस्तावास सदस्य सर्वश्री अनिल पाटील, ॲड. आशिष शेलार, चंद्रकांत पाटील यांनी अनुमोदन दिले. यानंतर हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी ॲड.राहुल नार्वेकर यांच्या नावाचा विधानसभा अध्यक्ष पदासाठीचा प्रस्ताव संमत झाल्याची घोषणा केली. ड.राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली.

ॲड. राहुल नार्वेकर यांच्या निवडीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा सदस्य सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, नाना पटोले, जयंत पाटील, नितीन राऊत हे ॲड. नार्वेकर यांना अध्यक्षपदी स्थानापन्न होण्यासाठी अध्यक्षपदाच्या आसनापर्यंत सन्मानपूर्वक घेवून गेले. सभागृहातील सर्व सदस्यांनी ॲड. नार्वेकर यांचे अभिनंदन केले.

## ॲड.राहुल नार्वेकर यांच्या रूपाने कायद्याचे उत्तम ज्ञान असणारे अध्यक्ष सभागृहाला मिळाले- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : सभागृहातील शिस्त आणि योग्य वर्तन ही लोकशाहीचा सन्मान उंचावणारे आहे. शिस्तशीर आणि वक्तशीर या लोकप्रतिनिधींना आवश्यक बाबी ड.राहुल नार्वेकर यांच्याकडे आहेत. संवादातून, चर्चेतून लोकशाही समृद्ध होत असते. राज्यातील जनतेला न्याय देण्याचे काम सभागृह करीत असते. ॲड. राहुल नार्वेकर यांच्या रूपाने कायद्याचे उत्तम ज्ञान असणारे अध्यक्ष सभागृहाला मिळाले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

विधानसभेच्या अध्यक्षपदी निवडीबदल मुख्यमंत्री श्री. फडणवीस हे अभिनंदनपर प्रस्तावावर बोलत होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, पुन्हा अध्यक्ष होण्याचा मान आतापर्यंत चारच जणांना मिळाला आहे. ड.नार्वेकर यांना हा बहुमान मिळाला आहे. विधानसभा अध्यक्षांचे दालन सभागृहातील सर्व पक्षांसाठी हक्काचे दालन असते. सभागृहात कितीही मतभिन्नता झाली तरी हक्काने अध्यक्षांकडे जाता येते. अध्यक्ष दोन्ही बाजूंचे ऐकतात. यावेळीही अध्यक्षांकडे ही जबाबदारी आहे. लोकशाहीत प्रभावी विरोधी पक्ष हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

विधिमंडळात जनसामान्यांच्या प्रश्नांवर चर्चा होऊन लोकशाही अधिक सुदृढ होईल. राज्यातील जनतेला न्याय देण्याचे काम या सभागृहात होते. सभागृहातील सदस्य महाराष्ट्रातील जनतेला न्याय देण्यासाठी प्रयत्नशील असतात. या सभागृहातील परंपरांचा मान – सन्मान निश्चितपणे कायम राहील. यापुढील काळातही नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सभागृहात व्यापक जनहिताचे निर्णय होतील. विधिमंडळाच्या प्रथा, परंपरा यांची उंची राखत सर्व सदस्यांना न्याय देण्याची भूमिका अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी त्यांच्या मागील अडीच वर्षाच्या काळात प्रामाणिकपणे पार पाडली असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांना सांगितले.

### विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांची भूमिका समन्यायी - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

विधानसभेच्या सभागृहात प्रत्येक घटकाला समान न्याय देतानाच सामजिक समतोल राखत समन्यायी भूमिका घेवून कामकाजाची विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांची हातोटी आहे. सलग दुसऱ्यांदा अध्यक्षपदी विराजमान होण्याचा मान त्यांना मिळाला आहे. त्यांचे नाव विधीमंडळाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

विधानसभेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवडीबदल उपमुख्यमंत्री श्री. शिंदे अभिनंदनपर प्रस्तावावर बोलत होते. ॲड. नार्वेकर यांचे विधानसभा अध्यक्ष म्हणून कामकाज कौतुकास्पद आहे. मागील अडीच वर्षात त्यांनी चांगले काम केले हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. अडीच वर्षात त्यांनी सखोल अभ्यास करून राज्याच्या हितासाठी अनेक चांगले निर्णय दिले. त्यांनी अध्यक्षपदाची उंची अधिक वाढवली आहे, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी काढले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानावर देशाचा, राज्याचा कारभार चालतो. राज्यात आता विकासाचे व प्रगतीचे नवे पर्व सुरु झाले आहे. अध्यक्षांच्या कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यास नक्कीच होईल. या सभागृहाचे पावित्र्य राखत राज्याला विकासाच्या महामार्गावर नेण्यास सर्वांनी प्रयत्न करूया असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

### महाराष्ट्र विधिमंडळाचे सभागृह हे देशाला दिशा देणारे - उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभा अध्यक्षांच्या अभिनंदन प्रस्तावावर म्हणाले, महाराष्ट्र विधिमंडळाचे सभागृह हे देशाला दिशा देणारे सभागृह आहे. या सभागृहाचा सन्मान सर्वांनी राखला पाहिजे. सभागृहाला संवेदनशील अध्यक्ष लाभले असल्याने त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात लोकहितकारी व परिणामकारक निर्णय होतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कायद्याची उत्तम जाण असणारे अध्यक्ष सभागृहाला लाभले आहेत. सभागृहासमोर आलेल्या प्रश्नांवर तितक्याच ताकदीने उत्तर देऊन त्यांनी सभागृह उत्तम चालविले असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

यावेळी विधानसभा सदस्य सर्वश्री जयंत पाटील, नाना पटोले, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, नितीन राऊत, विश्वजीत कदम, रोहित पाटील यांनीही अभिनंदनपर मनोगत व्यक्त केले.

## विशेष अधिवेशनात ९ डिसेंबर रोजी ४ नवनिर्वाचित सदस्यांनी घेतली सदस्यपदाची शपथ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभेच्या विशेष अधिवेशनात दि. ९ डिसेंबर रोजी ४ नवनिर्वाचित सदस्यांना विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास निळकंठ कोळंबकर यांनी सदस्यपदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली.शपथ घेतलेल्या सदस्यांमध्ये सर्वश्री जयंत राजाराम पाटील, विनय विलासराव कोरे (सावकार), सुनील शंकरराव शेळके, उत्तम शिवदास जानकर यांचा समावेश आहे. या विशेष अधिवेशनाच्या कालावधीत एकूण २८३ सदस्यांनी सदस्यपदाची शपथ घेतली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

## सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी राज्य शासन ठाम उभे - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी** : कर्नाटक सरकारकडून बेळगावसह सीमा भागातील मराठी भाषिक जनतेवर सुरु असलेल्या अन्यायाचा आम्ही निषेध करतो. मराठी माणसांनी मेळावे घेऊ नयेत, अशी कर्नाटक सरकारने घेतलेली भूमिका घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन करणारी आहे. तसेच कर्नाटक सरकारमधील एका मंत्र्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची कर्नाटक विधानसभेतील प्रतिमा काढणार असल्याचे वक्तव्य केले, हे गंभीर असून या घटनेचा राज्य शासन निषेध करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत स्पष्ट केले. तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सीमाभागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असून बेळगाव, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र होत नाही तोवर आमचा लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यातील १२ कोटी जनता आणि जगभरातील मराठी माणूस कर्नाटक सीमाभागातील मराठी माणसाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांसाठी आम्ही शिक्षण, आरोग्य सेवा उपलब्ध केल्या आहेत. यापुढे देखील सीमा भागातील मराठी भाषिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आमचे सरकार तत्पर राहील.

मराठी भाषिकांना विरोध करणारी कर्नाटक सरकारची भूमिका अन्यायकारक – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, सीमा भागातील मराठी भाषिकांच्या मेळाव्याला कर्नाटक सरकारने विरोध केला. महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य यांना अटक करण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींना स्थानबद्ध करण्यात आले. या कर्नाटक सरकारच्या कृत्याचा महाराष्ट्र शासन तीव्र निषेध करीत आहे. मी देखील मराठी भाषिकांच्या लढ्यात तुरुंगवास भोगला असून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जी भूमिका होती तीच भूमिका आमच्या सरकारची आहे. सर्वोच्च न्यायालयात शासनाच्या वतीने वकील दिले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे देखील यापूर्वी या प्रश्नाबाबत बैठक झाली होती. या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा होऊन देखील कर्नाटक सरकार अशी भूमिका घेत असेल तर कर्नाटक सरकारच्या या भूमिकेचा आम्ही निषेध करतो, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत बोलताना स्पष्ट केले.

याबाबत विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

## उद्योगपती रतन नवल टाटा यांच्यासह दिवंगत सदस्यांना विधानपरिषदेत श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानपरिषदेत उद्योगपती रतन नवल टाटा यांच्यासह दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यासंदर्भातील शोकप्रस्ताव मांडला. उद्योगपती रतन नवल टाटा यांच्यासह माजी वि.प.स. व माजी मंत्री रोहिदास चुडामण पाटील, लोकसभा सदस्य व माजी वि.प.स. वसंतराव बळवंतराव चव्हाण व सर्वश्री निवृत्ती विठ्ठलराव उगले, नरेंद्र बाबुराव बोरगावकर यांच्या दुःखद निधनाबद्दल विधानपरिषदेत शोक प्रस्ताव मांडला.



## दिल्लीतील ४० शाळांना ईमेलद्वारे बॉम्बने उडवण्याची धमकी; २५ लाख रुपये खंडणीची मागणी

नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्ली येथील ४० शाळांना सोमवारी ९ डिसेंबर रोजी बॉम्बच्या धमक्या देण्यात आल्या होत्या. ईमेलद्वारे धमकी पाठवणाऱ्या व्यक्तीने २५ लाख रुपयांची खंडणीची मागणी केली. ज्ञानदालनात बॉम्ब ठेवण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे. ज्यामुळे केवळ इमारतच कोसळणार नाही तर यामुळे मानव जातीचेही नुकसान होईल असा दावा संबंधित ईमेलमध्ये करण्यात आला.

धमकी पाठवणाऱ्या व्यक्तीने सांगितले की, शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका आहे. ज्या शाळेत धमक्या आल्या. ती शाळा दिल्ली पब्लिक स्कूल आरके पुरम आणि जीडी गोएंका या शाळांचा यामध्ये समावेश आहे. याप्रकरणाची माहिती आता दिल्ली पोलिसांना देण्यात आली. येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या खबरदारीसाठी त्यांना घरी पाठवण्यात आले असल्याचे सांगितले.

दिल्ली पोलिसांसह इतर काही सुरक्षा यंत्रणांनी या शाळांमध्ये पथके पाठवून संबंधित घटनेचा तपास सुरू केला. या तापासणीत काहीही निष्पन्न झालेले नाही. संबंधित धमकीचा ईमेल पाठवणाऱ्या व्यक्तीला लवकरच शोधून कारवाई करणार असल्याचे दिल्ली पोलिसांनी सांगितले आहे.



## 'मॅट'च्या ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन

➤ सेवा विषयक १३८ प्रकरणे तडजोडीने निकाली

➤ तीन प्रकरणांमध्ये १२६ अर्जदारांना शासकीय नोकरीचा लाभ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट) इतिहासात ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत ५४२ सेवा विषयक प्रकरणांपैकी १३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम यशस्वी करण्यात आला. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोक अदालतीसाठी तीन पॅनल आयोजित करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती विनय जोशी, सेवानिवृत्त सदस्य (न्या) ए. पी. कुऱ्हेकर, आर. बी. मलिक यांनी काम पाहिले. नितिन गद्रे (नागपूर), विजयकुमार (औरंगाबाद), विजया चौहान, संदेश तडवी, आर. एम. कोलगे आणि एम.बी. कदम यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. अदालतीत बरीच वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची मुख्य सादरकर्ता अधिकारी स्वाती मणचेकर यांनी तपासणी केली.

या लोक अदालतीमध्ये नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या तिन्ही खंडपीठातील ५४२ प्रकरणांपैकी १३८ निकाली निघाली. यामध्ये मुंबई खंडपीठाच्या– २३८ प्रकरणांपैकी ३९ तर नागपूर– खंडपीठाच्या १५० पैकी ६३ आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या १५४ प्रकरणांपैकी ३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली.



तीन प्रकरणांमध्ये १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी

लोक अदालतीत तीन प्रकरणात तडजोड झाल्याने १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंधारण विभागाच्या १७१ आणि कृषि विभागाच्या २१८ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित होत्या. यामध्ये सर्व जागांसाठी माजी सैनिक उमेदवार मिळू शकले नाही. त्यामुळे लोक अदालतीत तडजोडीनंतर उर्वरीत रिक्त जागा इतर उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आल्या. या निर्णयामुळे १२६ उमेदवारांना शासकीय नोकरी मिळू शकणार आहे. या निर्णयामुळे माजी सैनिकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही.

लोक अदालत यशस्वी करण्यासाठी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागातील सचिव यांच्यासह न्यायाधिकरणामधील सर्व अधिकारी, कर्मचारी, मुख्य सादरकर्ता अधिकारी, न्यायाधिकरण बार असोसिएशनमधील सर्व वकील, शासनाचे सर्व नोडल अधिकारी यांनी सहकार्य केले.

CMYK

## रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक

गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी नुकतीच जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्र्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

# बांगलादेशातील हिंदू विरुद्ध अत्याचार मोदी सरकारने रोखावेत

## सर्व जाती-धर्म एकता मंचची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी** ::बांगलादेशात अराजकता माजल्यानंतर हिंदू समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार होत आहेत. अनेक मंदिरांची नासधूस होत आहे.या बाबीची केंद्रातील मोदी सरकारने गंभीर दखल घेऊन कठोर पावले उचलावीत, अशी मागणी सोलापुरातील सर्व जात-धर्म एकता मंचने केली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना मनसेच्या शिष्टमंडळाने भेटून निवेदन सादर केले आहे. १९७२ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या खंबीर नेतृत्वाखाली भारत सरकारने पाकिस्तानला धडा शिकवून बांगलादेशाची निर्मिती करण्यात मोठा वाटा उचलला होता. परंतु याच बांगलादेशात अलीकडे राजकीय अराजकता माजल्यानंतर तेथील हिंदू समाजाला मोठ्या प्रमाणात लक्ष्य बनविले जात आहे. हिंदू कुटुंबीयांच्या



विरोधात मोठ्या प्रमाणात हिंसाचार होत असून मंदिरांचीही नासधूस केली जात आहे. ही बाब तमाम भारतीयांच्या दृष्टीने अस्वस्थ करणारी संतापजनक ठरली आहे. केंद्रातील मोदी सरकारने या प्रश्नावर वेळीच कठोर पावले उचलून बांगला देशातील हिंदू समाजावरील वाढते अन्याय अत्याचार थांबवावेत. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा पणाला लावावी, अशी मागणी या शिष्टमंडळाने केली आहे.

अखिल भारतीय मराठा महासंघाचे दास शेळके, वीरशैव लिंगायत समाजाचे विजयकुमार हत्तुरे, मुस्लीम समाजाचे रसूल पठाण, शीख समाजाचे पोपटसिंग टाक, ख्रिश्र्चन समाजाचे जेम्स जंगम, जैन समाजाचे पराग शहा यांच्यासह वडार समाजाचे शंकर चौगुले, जांबमुनी मोची समाजाचे देवेंद्र भंडारे, वीरशैव गवळी समाजाचे सागर कलागते, धनगर समाजाचे राज सलगर, बंजारा समाजाचे युवराज राठोड, चर्मकार समाजाचे संजय शिंदे, कोळी समाजाचे गणेश कोळी, नवबौद्ध समाजाचे प्रमोद गायकवाड, मातंग समाजाचे सुरेश पाटोळे, ब्राह्मण समाजाचे अजित कुलकर्णी, बेरड समाजाचे शाम धुरी आदींचा या शिष्टमंडळात समावेश होता.

## सभागृहातील सदस्य राज्यातील जनतेचे प्रतीक; जनतेला न्याय देण्यासाठी कार्य करणार - विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सभागृहातील सदस्य राज्यातील जनतेचे प्रतीक असून जनतेच्या आशा आकांक्षा व्यक्त करणारे हे सभागृह आहे. सभागृहाच्या वेळेचा राज्यातील जनतेच्या हितासाठी आणि न्यायासाठी उपयोग करून, जनतेला न्याय देण्यासाठी कार्य करणार असल्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात सांगितले.

विधानसभेत १५ व्या विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबदल सर्वांचे आभार मानत श्री. नार्वे कर म्हणाले, सदस्यांनी सभागृहात असताना समाजाच्या विकासाचा आणि समाजात वावरत असताना सभागृहाचा विचार डोळ्यासमोर ठेवून काम केले पाहिजे. सभागृहाचे कामकाज अधिक प्रभावी होण्यासाठी चतुसूत्री कार्यक्रम राबविण्यात येईल. सभागृहात सदस्यांना आपापल्या विधानसभा मतदारसंघातील समस्या मांडण्यासाठी प्रश्र्नोत्तराच्या तासाचे विशेष महत्व आहे. समिती पद्धती हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे, तर कायदा निर्मिती हे विधानमंडळाचे अंगीभूत महत्वाचे कार्य असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे कल्याणकारी संकल्पनेची प्रभावी अभिव्यक्ती आहे. सदस्यांना अर्थसंकल्पावरील चर्चा करण्यासाठी पुरेसा अवधी देऊन, मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी कार्य करून विधिमंडळ कामकाज करत असताना दोन्ही बाजूंचे सहकार्य आवश्यक असल्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.




# संत श्री संताजी जगनाडे महाराज यांचे विचार आणि साहित्य सर्वांनाच प्रेरणा देणारे- गुणवंत मिसलवाड

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : महाराष्ट्र भूमी ही संतांची, क्रांतिकारक, थोर समाजसुधारकांची भूमी असून १६ व्या शतकात जगतगुरु संत तुकाराम महाराजांनी लिहिलेली गाथा तथाकथित प्रस्थापितांकडून इंद्रायणी नदीत गाथा बुडवून नासधूस केली, पण संताजी जगनाडे महाराजांनी तीच गाथा मुखोद्गत लिहून १३ दिवसांत पूर्ण करुन जगासमोर एक आदर्श निर्माण केला अशा या महान विभूतीचे विचारकार्य आणि साहित्य आजच्या या आधुनिक काळात सर्वांनाच प्रेरणादायी आहेत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले.

ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार



येथे दि. ८ डिसेंबर २०२४ रविवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता तेली समाजाचे आराध्य दैवत, संत तुकाराम महाराज गाथेचे मूळ लेखक, प्रस्थापित अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारे वारकरी संत, तुकाराम महाराज यांचे पट्टशिष्य श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची ४०० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या अभिवादन कार्यक्रम सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. सर्वप्रथम आगाराचे सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक मा.श्री. श्रीनिवास रेणके यांच्या हस्ते श्री संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, खर्या अर्थाने जगतगुरु संत तुकाराम महाराजांच्या विचारांना जीवंत ठेवण्याचे महान कार्य जगनाडे महाराज यांनी केले असून, तुम्ही- आम्ही सर्वच जण या आधुनिक काळामध्ये आपल्या एसटी प्रवाशी सेवेसोबतच संत श्री जगनाडे महाराज यांचा आदर्श घेऊन समाजाप्रती, देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज आहे असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक श्रीनिवास रेणके, वाहतुक नियंत्रक आनंदा कंधारे, पाळी प्रमुख अविनाश भागवत, एस.टी. मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, सुरक्षा रक्षक पांडूरंग बुरकुले, यांत्रिक मयुर गायकी, प्रसाद गोंदगे, रुद्राक्ष आनलदास, लिपीक निखील सावरीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार- कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### वर्धापन दिनानिमित्त मनपाच्या वाहनांचे संचलन; ३० प्रकारच्या वाहनांचा संचलनात समावेश



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : आज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या सेवेत शामिल वाहनांच्या संचालन करण्यात आले.सदरील संचलनाचे उद्घाटन महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी यांत्रिकी विभाग सेंट्रल नाका येथे हिरवा झेंडा दाखवून केले. यावेळी शहर अभियंता ए. बी देशमुख, मुख्य लेखापरीक्षक शी. बा नाईकवाडे, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी अहमद तौसीफ यांची उपस्थिती होती. सदरील संचालनची सुरुवात सेंट्रल नाका येथून झाली तर सेवन हिल, मुकुंदवाडी, चिकलठाणा, सिडको बसस्थानक, जळगाव रोड, हर्सुल टी पॉइंट, दिल्ली गेट, बसस्टँड, बाबा पेट्रोल पंप, रेल्वे स्टेशन,महानुभाव चौक, बीड बायपास, शहानूर मियां दर्गा, सुत गिरणी चौक, सेवन हिल, क्रांती चौक, महावीर चौक, बसस्टँड मार्गे आमखास मैदान येथे समारोप झाला. या संचलनात महापालिकेतील ३० प्रकारची वाहनांचा समावेश होता. या संचलनचे उद्देश नागरिकांना महापालिकेची क्षमता तसेच त्यांच्या सेवेत किती प्रकारचे वाहने उपलब्ध आहेत याची जाणीव करून देणे हा होता. जेसीबी, हुकलोडर, रुग्णवाहिका, टिपर, ट्रॅक्टर लोडर व इतर वेगवेगळ्या वाहनांचा या पथसंचलनामध्ये समावेश होता.

### स्वस्त धान्य दुकानातील तांदळाची खिचडी शिजवून तहसीलदारांना भेट देत आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : बीडच्या तहसील कार्यालयाबाहेर सामाजिक कार्यकर्त्यांनी लक्षवेधी आंदोलन केलं आहे. जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांवर सर्वसामान्यांना निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे याच प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी तहसील कार्यालयाबाहेर स्वस्त धान्य दुकानातील तांदळाची खिचडी शिजवून तहसीलदारांना भेट दिली आहे.

बीड तालुक्यातील अंजनवती, चराटा, काळेगाव हवेली यासह इतर गावांमध्ये निकृष्ट दर्जाचे स्वस्त धान्याचे वितरण होत आहे. त्यामुळे ग्रामस्थांसह सामाजिक कार्यकर्त्यांनी हे लक्षवेधी आंदोलन केले आहे. दक्षता समिती केवळ कागदोपत्री असून ती सक्षम केली जावी जेणेकरून यावर नियंत्रण होईल असे मत आंदोलकांनी व्यक्त केले आहे. आंदोलकांनी काही तांदूळ व गहूचे नमुने दाखवले, निकृष्ट दर्जाचे धान्य लाभार्थ्यांना देऊ नये अशा आम्ही दुकानदारांना सूचना देतो, लाभार्थ्यांना देखील आवाहन राहिल की खराब धान्य घेऊ नये ते दुकानदारांना परत करावे. याबाबत दुकानदारांना लेखी सूचना देण्यात येणार असल्याची प्रतिक्रिया तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिली आहे.

### समाज विकास विभाग उपायुक्तांनी साधला तृतीयपंथीयांशी संवाद

**कल्याण/प्रतिनिधी** : तृतीयपंथी समुदाय हा समाजातील एक दुर्लक्षित, उपेक्षित समाज आहे, या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी आज अस्मिता किन्नर संस्थेच्या कल्याण पूर्व येथील कार्यालयास भेट देऊन तेथील तृतीयपंथीयांशी संवाद साधला, त्यांच्याशी चर्चा करत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि समाजातील या दुर्लक्षित घटकास मुख्य प्रवाहात आणून मानसन्मानाने जगण्यासाठी काय उपाययोजना करता येतील याबाबत तृतीयपंथीयांच्या गुरू नीता केणे यांचेशी सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्र शासनाचे तृतीयपंथीयांसाठीचे धोरण २०२४ ची अंमलबजावणी करण्याचे काम कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने हाती घेतले आहे. तृतीयपंथीयांची प्रथम महापालिकेकडे नोंदणी करून त्यांचे मनोगत ,त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी त्यांच्यासाठी प्रथमतः महापालिकेच्या नाट्यगृहात किन्नर महोत्सव आयोजित केला जाईल, त्यांचे बचत गट तयार करून त्यांना व्यवसायभिमुख प्रशिक्षण देऊन उदर निर्वाहासाठी मार्केट उपलब्ध करून त्यांच्या उपजीविकेसाठी महापालिकेमार्फत सहकार्य केले जाईल अशी प्रतिक्रिया उपायुक्त संजय जाधव यांनी दिली आहे.



# राज्यपाल पद मिळवून देण्याच्या अमिषाने एका महाठगाकडून शास्त्रज्ञाची फसवणूक

दैनिक आपला विदर्भ



**नाशिक/प्रतिनिधी** : कोणत्याही राज्याचे राज्यपाल मिळवून देण्याचे आमिष दाखवत नाशिकच्या एका भामट्याने तमिळनाडूतील शास्त्रज्ञाला ५ कोटींचा गंडा घातलाय. निरंजन कुलकर्णी असं या महाठगाचे नाव असून बिंग फुटल्यानं नाशिकसह महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडालीये. तामिळनाडूतील शास्त्रज्ञ नरसिम्मा रेड्डी यांनी नाशिकच्या मुंबई नाका पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल केलाय. संशयित निरंजन कुलकर्णी याला नाशिक पोलिसांनी नागपुरातून अटक केलीये. राजकिय व्यक्तींशी संबंध असल्याचे सांगत दिल्लीत एका कार्यक्रमात संशयित आरोपी कुलकर्णी आणि तक्रारदार रेड्डी यांच्यात ओळख झाली होती. वर्षभरापासून संशयित आरोपी आणि तक्रारदार यांच्यात संवाद सुरू होता,

मात्र काही महिन्यांपासून कुलकर्णी यांच्याकडून राज्यपाल पदाबाबत काहीही होत नसल्यानं आणि दिलेले पैसेही परत देत नसल्यानं रेड्डी यांनी नाशिक पोलिसांकडे धाव घेतली होती. संशयित निरंजन कुलकर्णी हा नागपूर येथील वैश्विक सामाजिक संस्थेचा सभासद असून त्याच संस्थेच्या नावावर मिळलेल्या ५ कोटींपैकी २ कोटी ४० लाखांची १६ एकर जमीन घेतलीये, तर २ कोटींची आपल्या वडिलांच्या नावावर एफडी केलीये. तर ६० हजार रुपये रोखीत घेतले होते. निरंजन कुलकर्णी याला हायप्रोफाईल लाइफस्टाइल जगण्याची हौस होती, तो आपल्या गाडीवर खासदारकीचा लोगो लावूनही फिरत असे. अनेक मोठ्या नेत्यांच्यासोबत संबंध असल्याचे भासविण्यासाठी त्याने मॉर्फ फोटो केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. सामाजिक कार्यकर्त्या म्हणून तो नागपूरसह दिल्लीत वावरत असल्याचं समोर आलं आहे. रेड्डी यांचे एक नातेवाईक माजी खासदार आहेत, त्यांना राज्यपाल करण्यासाठी ही रक्कम कुलकर्णी याने घेतल्याचं पोलिसांचे म्हणणे आहे. संशयित कुलकर्णीसोबत या संपूर्ण प्रकरणात असलेल्या आणखी साथीदारांच्या मागावर नाशिक पोलिसांची काही पथके आहेत. जसा जसा पोलिसांचा तपास पुढे जातोय तसे तसे या प्रकरणाची धागेदोरे वाढतच चालली आहेत. त्यामुळे हे प्रकरण कोणत्या दिशेला जातं याकडं सर्वांचेच लक्ष लागून आहे.

## पार्टीच्या वादातून तरुणाची चाकूने भोसकून हत्या; शिवाजीनगर पोलिसांनी १२ तासातच आरोपीला ठोकल्या बेड्या



**कल्याण/प्रतिनिधी** : पार्टीत झालेल्या वादातून एका तरुणाची धारदार शस्त्राने भोसकून हत्या केल्याची घटना अंबरनाथच्या बारकूपाडा परिसरात घडली होती. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी अवघ्या १२ तासातच आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. बारकू पाडा परिसरात तुषार देडे हा १८ वर्षीय तरुण त्याचा मित्र महेश डाबी आणि अन्य काही जणांसोबत पार्टी करत बसला होता. यावेळी तिथे आलेला आरोपी समीर वाघे याचे त्यांच्याशी वाद झाले. या वादातून समीर वाघे याने त्याच्याकडे असलेल्या धारदार शस्त्राने महेश डाबी आणि तुषार देडे यांच्यावर वार केले. यात गंभीर जखमी झालेल्या तुषार देडे याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी तपासाची अवघ्या १२ तासातच आरोपी समीर वाघे याला अंबरनाथ एमआयडीसी परिसरातून अटक केली आहे.

## केडीएमसी हद्दीतील ६५ बेकायदा इमारती तीन महिन्यांत जमीनदोस्त करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश



दैनिक आपला विदर्भ



**कल्याण/प्रतिनिधी** :खोट्या कागदपत्रांच्या आधारे महापालिकेची परवानगी मिळविल्याचे भासवून 'रेरा' प्राधिकरणाकडून बांधकाम प्रमाणपत्र मिळविणाऱ्या ६५ बेकायदा इमारती येत्या तीन महिन्यांत जमीनदोस्त करा, असे आदेश उच्च न्यायालयाने कल्याण-डोंबिवली महापालिका प्रशासनास दिले आहेत. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ६५ बेकायदा इमारतींपैकी ४७ इमारती पाडण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या कारवाईमुळे सुमारे ६,५०० नागरिकांच्या डोक्यावर बेघर होण्याची टांगती तलवार आहे. या प्रकरणातील याचिकाकर्ते संदीप पाटील यांनी महापालिकेच्या हद्दीतील ६५ इमारतींना महापालिकेची परवानगी मिळाल्याचे भासवून बिल्डरांनी 'रेरा' प्राधिकरणाकडून बांधकाम प्रमाणपत्र मिळविले. ही बाब पाटील यांनीच माहिती अधिकारात उघड केली. त्यानंतर या प्रकरणात त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर १९ नोव्हेंबरला सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान न्यायालयाने महापालिका प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. विधानसभा निवडणुकीमुळे पोलिस बंदोबस्त न मिळाल्याने कारवाई करता आलेली नाही. पोलिस बंदोबस्त मिळताच कारवाई केली जाईल. त्यावर येत्या तीन महिन्यांत या ६५ बेकायदा इमारती जमीनदोस्त करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. केडीएमसीने १७ इमारतीवर या अगोदर कारवाई केली होती मात्र ४८ इमारतींवर कारवाई करणे बाकी आहे.

## चांदवड रेणुका देवी मंदिराच्या घाट पायथ्याशी मालट्रक पलटी झाल्याने ७५ वर्षे वृद्धाचा मोटर सायकलसह ट्रक खाली दबून मयत

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : चांदवड मुंबई आग्रा महामार्गावरील चांदवड येथील रेणुका देवी मंदिराच्या घाट पायथ्याशी चांदवड येथून घरी राहुड येथे मोटरसायकल नंबर एम एच १५ एच इ ४९५१ हिच्यावरून एकनाथराव शंकर पवार वय वर्षे ७५ राहणार राहुड तालुका चांदवड हे जात असताना, त्यांच्यापुढे रेणुका देवी घाटापुढे ट्रक नंबर एम एच 18 E.E.62 99 ह्या गाडीत युरिया सारखा खताचा पदार्थ घेऊन जात असताना. या मालगाडीचा घाटात मोसम तुटल्यामुळे गाडी ही पाठीमागे आली तेव्हा त्या गाडीच्या पाठीमागे मोटरसायकलवर एकनाथराव शंकर पवार हे गाडीखाली दाबले गेले व ते जागेवर मयत झाले.



या घटनेची माहिती सोमा टोल कंपनीच्या कर्मचाऱ्यांना मिळतात त्यांनी घटनास्थळी जाऊन मदत कार्य सुरू केले. यावेळी चांदवड पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी कैलास वाघ, एपीआय आखेगावकर त्याचप्रमाणे चांदवड पोलीस कर्मचारी तसेच पिंपळगाव महामार्गावरील पोलीस कर्मचारी, पोलीस हवालदार सदगीर पोलीस हवालदार मुलमुले, पोलीस नाईक बोडके, पोलीस शिपाई गांगुर्डे, पोलीस शिपाई वाघ यांनी घटनास्थळी जाऊन नागरिकांच्या मदतीने गाडीखाली दबलेल्या पवार यांना काढण्यासाठी दोन हायड्रोलिक कॅरण मशीन लावून दबलेल्या व्यक्तीला बाहेर काढून चांदवड येथील उपजिल्हा रुग्णालय चांदवड येथे आणून त्यांची उत्तर तपासणी करून नातलगांच्या ताब्यात देण्यात आले. यावेळी या ठिकाणी हजरच्या संख्येने दाबलेल्या व्यक्तीला बाहेर काढण्यासाठी नागरिकांनी मदत केली.

### बांगलादेशातील अत्याचारा विरोधात हिंगोलीत आज जन आक्रोश मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली/प्रतिनिधी** : बांगलादेशात हिंदू नागरिकांवार अत्याचार केले जात असून त्याच्या निषेधार्थ मंगळवारी दि. १० डिसेंबर रोजी सनातन धर्माच्या वतीने हिंगोलीत जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा गांधी चौक येथून सकाळी दहा वाजता मोर्चाला मार्गदर्शन केले जाणार आहे, त्यानंतर अकरा वाजता मोर्चाला शहरातून सुरुवात होणार आहे. या हिंदू जन आक्रोश मोर्चात हजारो च्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सकल हिंदू समाज आणि महंत विनय दास महाराज यांनी केले आहे.

# तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत आणि मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या विरोधात गुन्हा दाखल करा- सुषमा अंधारे

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : बीडच्या आंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात बोगस औषध गोळ्या पुरवठा संदर्भात तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत, व राज्याचे अन्न औषध प्रशासन मंत्री धर्मराज बाबा आत्राम यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करा अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली आहे. तसेच या दोन्ही व्यक्तींना नव्या मंत्रिमंडळात समाविष्ट करु नये असे सुषमा अंधारे यावेळी म्हणाल्या आहेत. तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी जी टेंडर प्रक्रिया पारित केली त्यानुसार जी बनावट औषधे





खरेदी केली ती ज्या कंपनी कडून खरेदी केली त्या कंपनींना सर्टीफाईड करण्याचे काम हे अन्न व औषध प्रशासन मंत्रालय करते. या अन्न व औषध प्रशासन मंत्रालयाचे तत्कालीन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी कोणतीही तपासणी न करता, अशी कोणतीही कंपनी अस्तित्वात आहे की नाही हे न पाहता या कंपन्यांना सर्टीफाईड केले आणि त्याच्या आधारावार तानाजी सावंत यांनी क्रॉस चेक न करता, पारंपारिक औषध खरेदीची प्रक्रिया बाजूला ठेवून एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली आणि अन्न व औषध खरेदी प्राधिकरणच्या वतीने औषधी खरेदी केली ही तानाजी सावंत यांची चूक आहे. या प्रकरणात सभागृहाच्या आत तसेच वेळ आली तर सभागृहाबाहेर रस्त्यावरची लढाई लढू अशी प्रतिक्रिया सुषमा अंधारे यांनी दिली आहे.

# सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : माजी सैनिकांच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी संपूर्ण भारतात पाळण्यात येणारा सशस्त्र सेना ध्वजदिन शनिवारी सैनिकी सभामंडप, बुलढाणा येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बुलढाण्याचे उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमाला उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राधिका चव्हाण, पुर्व सैन्य भरती प्रशिक्षण केंद्राचे संचालक संचालक कर्नल सुकुमारण (नि), स्क्वॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. सरोदे रुपाली पांडुरंग यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी सैनिकांच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी संपूर्ण भारतात ७ डिसेंबर हा ध्वजदिन म्हणून पाळण्यात येतो व त्या निमित्त्याने पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेरपर्यंत निधी गोळा केला जातो.





भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राणार्पण केले अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडीअडचणी दुर करून त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे, यासाठी आणि युध्दात अपंगत्व आलेल्या व सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा विनियोग केला जातो. मागील वर्षी बुलढाणा जिल्ह्याला ५३ लक्ष ३८ हजार रुपये गोळा करण्याचा इष्टांक देण्यात आला होता. बुलढाणा वासियांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने हा इष्टांक ५५ लाख ९० हजार रुपये अर्थात १०५ टक्क्यांनी पूर्ण केला आहे, अशी माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

## विविध वृत्त...

### गोंदिया जिल्ह्यात चुकारे रखडलेल्या शेतकऱ्यांना लवकरच पैसे मिळणार; आदिवासी विकास महामंडळ संचालकांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी** : धान उत्पादकांचा जिल्हा म्हणून गोंदिया जिल्ह्याची सर्वत्र ओळख आहे. गोंदिया जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात धान पिकाची शेती खरीप व रब्बी हंगामात करत असतात. यावर्षी खरीप हंगामातील धानाची कापणी झाली असून अनेक शेतकऱ्यांनी आपले धान पीक आदिवासी विकास महामंडळाच्या आधारभूत धान्य खरेदी केंद्रावर विक्री केले आहे. आतापर्यंत २ लाख क्विंटल खरेदी गोंदिया जिल्ह्यात झाली असून त्याचे ४७ कोटींचे चुकारे शासनाकडे थकलेले आहेत. मात्र अद्याप शासनाने चुकारे दिलेले नाहीत. आदिवासी विकासमहामंडळाने प्रादेशिक कार्यालयाला सूचना केले असता त्यांनी पैसे देण्यामध्ये काही तांत्रीक अडचणी येत आहेत, आदिवासी महामंडळाकडून यासाठी प्रयत्न सुरु आहेत, लवकरच पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर येतील असे सांगण्यात आले असल्याची माहिती आदिवासी विकासमहामंडळसंचालक भरतसिंग दुधनांग यांनी दिली आहे.

### कृषक जमीन अकृषक दाखवून दस्त नोंदणी करत ३०० कोटींचा महसूल बुडवणाऱ्यांवर कारवाई करा; मनसेची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : कृषक जमीन अकृषक दाखवून दस्त नोंदणी करून सह दुय्यम निबंधक कार्यालयातून तीनशे कोटीचा जवळपास भ्रष्टाचार झाल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून करण्यात आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष आदित्य दुरुगकर यांनी निवेदन देत कारवाईची मागणी केली आहे. यावेळी मनसे कडून अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला होता. गुंठेवारी पद्धतीने जमिनीचे तुकडे पाडून शासनाचा महसूल बुडवला, गुंठेवारी पद्धतीने एक प्रकारे सुप्रीम कोर्टाचा निर्बंध असताना नियमाला धाब्यावर बसवून ही नोंदणी करण्यात आली. नोंदणी करत असताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा आरोप करण्यात आला. नागपूर शहर आणि ग्रामीण मधील दुय्यम निबंध कार्यालय क्रमांक २,३,४,५,६ आणि १० या कार्यालयातू मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. येत्या सात दिवसात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करा. अन्यथा हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री यांच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करु असे मनसे जिल्हाध्यक्ष आदित्य दुरुगकर यांनी सांगितले आहे.

### 'सावळ्याची जणू सावली' फेम प्राप्ती रेडकरचा 'पुष्पा २'मधील 'अंगारो' गाण्यावर जबरदस्त डान्स

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सध्या सर्वत्र 'पुष्पा २: द रुल' चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदाना यांची प्रमुख भूमिका असणाऱ्या 'पुष्पा २: द रुल' चित्रपटाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर तगडी कमाई करत बरेच रेकॉर्ड मोडताना दिसत आहे. अवघ्या चार दिवसात जागतिक स्तरावर 'पुष्पा २: द रुल' चित्रपटाने ८०० कोटींहून अधिक गल्ला जमवला आहे. तर भारतात ५३१ कोटींचा व्यवसाय केला आहे. ८ डिसेंबरला, रविवारी फक्त एका दिवसांत या चित्रपटाने १४२ कोटींची कमाई केली आहे. 'पुष्पा २: द रुल' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे.

'पुष्पा २: द रुल' या चित्रपटातील गाण्यांनी अक्षरशः वेड लावलं आहे. त्यामुळे सोशल मीडियावर सर्वसामान्यांसह कलाकार मंडळी 'पुष्पा २' चित्रपटातील गाण्यावर थिरकताना दिसत आहे. अशातच 'सावळ्याची जणू सावली' मालिकेतील अभिनेत्री प्राप्ती रेडकरच्या डान्स व्हिडीओने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे.

# बुलडाणा येथे निघणाऱ्या आक्रोश- न्याय मोर्चात हिंन्दु समाज बांधवांनी सहभागी व्हावे

## शिवसेना नेते तथा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : बांग्लादेशात अल्पसंख्यांक हिंदू समुदायावर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने बुलडाणा येथे,१० डिसेंबरला आक्रोश न्याय मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चाला मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना नेते तथा केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे.

गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून बांग्लादेशात अल्पसंख्यांक हिंदू समाजावर अत्याचार होत आहेत. दररोज बलात्कार, खून, लुटमार, जाळपोळीच्या घटना घडत आहेत. या घटना निंदनीय असून मानवजातीला काळीमा फासणाऱ्या आहेत. केवळ हिंदू आहेत म्हणून हा अत्याचार होत आहे का ? असा प्रश्न उपस्थित होत असून या घटनेचा निषेध नोंदणीसाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने बुलडाणा येथे आयोजित आक्रोश मोर्चात हिंदू बांधवांनी हजारांच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना नेते तथा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे.



# बुलढाणा येथे पाच दिवसीय पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रद्वारा जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजागार युवक व युवतींसाठी बुलडाणा येथे शेळीपालन, कुक्कुटपालन, गाय, म्हेसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि १८ ते २२ डिसेंबर या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हेस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ञ व्यक्ती करणार आहे.

प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५ वी पास, वय १८ ते ५० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी दि. १८ डिसेंबरपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालया जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ९०११५७८८५४ / ८२७५०९३२०१ या भ्रमणध्वनीवरही संपर्क साधण्याचे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.

# एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमध्ये प्रवेशासाठी अर्ज स्विकारण्यास सुरुवात

## २३ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार परीक्षा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी अर्ज स्विकारण्यास सुरुवात झाली प्रवेश परीक्षा ही दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. इच्छूकांनी आपले अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या परिक्षेकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचे कार्यक्षेत्रातील अकोला, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच सर्व शासनमान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीचे विद्यार्थी या स्पर्धा परिक्षेसाठी पात्र राहतील. या सर्व शाळेतील मुख्याध्यापक यांनी प्रवेश परिक्षेचे आवेदन पात्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेवून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला या कार्यालयाकडे सादर करावे. विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय किंवा अनुदानित आश्रम शाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचेकडे विनामुल्य उपलब्ध आहेत. या परिक्षेसाठी अर्ज भरण्याची मुदत दि.१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत असून इच्छुकांनी आवेदन पत्र हे प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापक यांचे मार्फत सादर करावा. या आवेदन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या वार्षिक उत्पन्नाचा तसेच पालकांचा किंवा विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला जोडण्यात यावा.

परिक्षेचे ठिकाण व वेळ

प्रवेश परीक्षा ही दि.२३ फेब्रुवारी, २०२५ रोजी होणार असून इयत्ता ६ वी करिता सकाळी ११ ते १.०० या वेळेत व इयत्ता ७ वी ते ९ वी करिता सकाळी ११ ते ०२.०० या वेळेत होईल. याही परीक्षा शासकीय आश्रम शाळा, कोथळी ता. बार्शिटाकळी जि. अकोला. शासकीय आश्रम शाळा, घाटबोरी ता. मेहकर जि. बुलडाणा या ठिकाणी होणार आहे.

### अल्पसंख्याक शाळेतील गैरप्रकार खपवून घेतले जाणार नाहीत - अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान

**नागपूर/प्रतिनिधी** : अल्पसंख्याक समाजातील मुलांना योग्य शिक्षण मिळावे, अभ्यासातून त्यांना पुढे येता यावे यासाठी त्यांना त्यांच्या भाषेतून शिक्षण देणे उचित राहील अशा भूमिकेतून शासनाने उर्दू भाषेतील शाळांना मान्यता दिली. यासाठी अनुदानाची व्यवस्था केली. एक व्यापक दृष्टीकोन शासनाने ठेवला. तथापि काही संस्थांनी शासनाच्या या उद्देशाला हरताळ फासल्याचे महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी उद्विग्न होऊन सांगितले. अल्पसंख्यांक शाळेतील कोणतेही गैरप्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असे बजावून त्यांनी शिक्षण विभागाला अशा गैरप्रकाराविरुध्द तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील बचत भवन येथे अल्पसंख्याक आयोगाच्या वतीने आज विविध दाखल प्रकरणांबाबत सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत एका प्रकरणाबाबत त्यांनी आपल्या मनोगतात शिक्षण संस्थेच्या कार्यपध्दतीतील दोषांबाबत बोलतांना हे निर्देश दिले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे व वरिष्ठ अधिकारी, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शाळांचे संस्थाचालक, पदाधिकारी आणि शिक्षक उपस्थित होते.

उर्दू भाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दहावीनंतर अभियांत्रीकी, वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश घ्यावयाचा झाल्यास त्याला अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. हे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. या विद्यार्थ्यांना पहिलीपासूनच चांगल्या वातावरणासह शिक्षणाची सुविधा पुरविण्याची जबाबदारी ही संस्थाचालकाची आहे. उर्दू भाषेतील अनेक शाळेत घाणीचे साम्राज्य असून तिथे बसणे अत्यंत अवघड आहे. संस्थाचालकांनी शाळांकडे व्यवसायाच्या नजनेतून न पहाता आपण भविष्यातील पिढ्यांना घडविण्यासाठी आपली संस्था सुरु केली आहे याचे भान ठेवावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# आदिवासी समाजातील सर्वच बांधवांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र द्या

## सामाजिक कार्यकर्त्या गीतांजली कोळी यांची धुळे ते नागपूर पदयात्रा

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील सर्वच समाज बांधवांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळावे या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते गीतांजली कोळी मागणी करीत आहे त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे त्यांनी अखेर आज धुळे ते नागपूर पदयात्रा काढत १९ डिसेंबर होणाऱ्या हिवाळी अधिवेशन दरम्यान आपली मागणी मांडणार असल्याची माहिती त्यांनी दिली.




स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे उलटून देखील महाराष्ट्रातील मूळ आदिवासी असलेल्या आदिवासी कोळी, ढोर, टोकरे कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी या जमात बांधवांना आदिवासी असूनही अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. हे प्रमाणपत्र मिळावे या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून धुळ्यातील सामाजिक कार्यकर्त्या गीतांजली कोळी या आंदोलन करीत असून यंदाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या प्रमाणपत्राच्या मागणीसाठी धुळे ते नागपूर पदयात्रा काढली असून आज पासून या पदयात्रेला सुरुवात करण्यात आली आहे. १९ डिसेंबर रोजी नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनावेळी आपल्या प्रमाणपत्राच्या मागणीबाबत आपण मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.